2021-22



RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price** : **Rs. 300/-**
**Annual Subscription:** **Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*Octomber Special Issue - III 2021*

Editorial Officer

**Kranti Publication**

Georai Dist.Beed

Beed -431 127

Contact : 7875827115

**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**

Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P.Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

# Guidelines for Writers

- "Power of Knowledge" the referred research journal has permission and registered of RNI, Ministry of Information and Broadcasting, Govt, of India.

  Research papers in all subjects of all faculties in Hindi, English, Marathi will be published in "Power of Knowledge".

- Research scholars should sent their papers in Marathi, Hindi and English on one side typed papers. It should be in Pagemaker or word format with a CD. Scholars should send their papers through registered / speed post. A Xerox copy of papers should be enclosed.

- The writer should give a letter of undertaking that he / she has not violated copy right act and the whole responsibility will not be liable of any legal action. This undertaking is compulsory with the research paper.

- Directions regarding fonts

  English **Times New Roman or any 12** font

  Hindi & Marathi **ISM DVB TT- Surekh Pagemaker, Font 14**

- Research paper should be in A-4 size upto 4-5 pages, value language and references should be mentioned.

- There should not be grammatical mistakes.

- If the research paper published in "Power of Knowledge" not accepted by Research Recognition Committee/University Body/other research related committees, the Editor/Printer/Publisher will not take any responsibility of the same.

- All the postal contact should be to the address of editor through registered post only.

- Despute shall be subject to hearing at Hon'ble BEED (M.S.) Jurisdiction only.

Ideas expressed in "Power of Knowledge" belongs to the writer exclusively. The editor, publisher & printer of "Power of Knowledge" have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act, they will be responsible for their own action. Hence, it is clarified from editor, publisher and printer's side.

अनुक्रमणिका


| अ.क. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | A study of working capital management of bajaj healthcare ltd. | Dr. Vijay Narayan Gaikwad | 1-6 |
| 2 | The Agitation of APCSU in Arunachal Pradesh | Abhijit Bag | 7-10 |
| 3 | A Feminist Reading Of R. K. Narayan's 'The Dark Room' | Mr. Badale Jaganath Dnyanoba | 11-13 |
| 4 | Relooking the National Education policy 2020 from the perspective of the Libraries: a study | Bikash Kumar Halder | 14-18 |
| 5 | A Study of Khaled Hosseini as a Diasporic writer | Dr.Ganesh J.Gaikwad | 19-22 |
| 6 | Health & Wellbeing | Dr. Ayodhya Pawal | 23-26 |
| 7 | Historical Insights Vital To The Understanding | Dr.Chincholkar Bandopant. B. | 27-31 |
| 8 | Position Of Native Women In The Vision Of Katherine Mayo (20th Century Bengal) | Moumita Datta | 32-38 |
| 9 | The Socio-Cultural Transformation of Bhumij Tribe in Purulia District of West Bengal in Colonial and Post Colonial Period : A Historical Analysis | Nilanjan Chaki | 39-44 |
| 10 | "Population growth and economic Development : A Geographical Studies." | Dr. Ghodke .J.V. | 45-47 |
| 11 | जगदीश खेबुडकर यांचे चित्रपटबाहय गीत लेखान | डॉ अनुराधा वसंत गुजर | 48-52 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी जाणिवा | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 53-59 |
| 13 | कृषक कवी विठ्ठल वाघ | डॉ.अभिमन्यू गेना ओहळ | 60-64 |
| 14 | मला उद्ध्वस्त व्हायचयं' मधील परखड आणि स्पष्टवक्ती मल्लिका | प्रा.डॉ.रेखा नारायणराव वाघ | 65-68 |
| 15 | भिल्ल बोली भाषेतील कथा 'एक डोळी अन् एक डोहू' | डॉ.योगिता देवगिरीकर | 69-71 |
| 16 | कन्नड दलित कथा | डॉ.धनपाल कांबळे | 72-74 |
| 17 | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा जमातीच्या बोलीचे स्वरुप व निराळेपणा | डॉ.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे | 75-79 |
| 18 | गोविंद पुरुषोत्तम देशपांडे यांचे 'सत्यशोधक' हे नाटक : एक सामाजिक - राजकीय दस्तऐवज | प्रा.शैलेश औटी | 80-84 |


अ.ह्या. शिक्षण संस्था ... महाविद्यालय

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी जाणिवा

**डॉ.राजेश्वर दुडूकनाळे**

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग

देगलूर महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म ही मराठी साहित्यातील एक क्रांतिकारक घटना आहे. कोल्हापूर आणि साताऱ्याच्या मध्यभागी डोंगराच्या पायथ्याशी वसलेले वाटेगाव म्हणजे एक नयनरम्य निसर्गचित्र। कृष्णा आणि वारणा नदीच्या कुशीत विसावलेला हा परिसर. सह्याद्रीच्या पर्वतरांगांना साक्षीला ठेवून अनेक शूरवीरांनी याच मातीत इतिहास घडविला. अशा शूर मातीचा, सौंदर्यसंपन्न निसर्गाचा वारसा सांगणाऱ्या सांगली जिल्ह्यातील वाटेगावमध्ये १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे. आईचे नाव वालूबाई. राघोबा साठे अण्णा भाऊंचे पंजोबा तर सिधोजी साठे आजोबा. कामगार, कवी, लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, लोकनाट्याचे जनक, उत्तम नट, पत्रकार, निर्माता, आणि माणसावर, मानवी जीवनावर उत्कट प्रेम करणारा माणूस असे विविध पैलू अण्णा भाऊंच्या व्यक्तिमत्त्वात आहेत. या अर्थाने अण्णा भाऊ साठे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व ठरते.

अस्पृश्य जातीमध्ये जन्म झाल्यामुळे अण्णा भाऊ साठे यांना बालपणापासूनच दारिद्र्याचे आणि सामाजिक विषमतेचे चटके सहन करावे लागले. एक-दोन दिवसांचा अपवाद वगळता अण्णा भाऊंचे औपचारिक शिक्षण फारसे झाले नाही. जीवनाच्या शाळेतच अण्णा भाऊ घडत गेले. अर्थातच औपचारिक शिक्षण न मिळाल्यामुळे अनौपचारिक शिक्षणातून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक समृद्ध होत गेले. त्यांचा वाटेगाव ते मुंबई हा प्रवासच मुळात कामाच्या, भाकरीच्या शोधात झाला आहे. त्यामुळे मुंबईत आल्यानंतर त्यांना पोटासाठी अनेक प्रकारची कामं करावी लागली. बालपणातील अशा दाहक, वेदनामय अनुभवामुळे त्यांचे मन बंडखोर, विद्रोही बनत गेले. मुंबईमध्ये पोटासाठी अनेक प्रकारची कामं करताना, कामगार म्हणून वावरताना त्यांना मार्क्स, लेनिन, गॉर्कीच्या विचाराने प्रभावित केले. समाजातील आर्थिक विषमता, दारिद्र्य नष्ट करण्याचा आणि सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा समान हक्क देणारा मार्ग म्हणून त्यांना मार्क्सवाद प्रेरक वाटला. रशियन मार्क्सवादी कादंबरीकार गॉर्की हा अण्णा भाऊ साठेंचा आवडता लेखक आहे. गॉर्कीच्या साहित्याचा आणि विचाराचा मोठा प्रभाव त्यांच्या साहित्यावर दिसून येतो. त्यामुळेच ते साहित्याकडे समाजपरिवर्तनाचे, क्रांतीचे एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून पाहतात. उपेक्षित समाजाला सर्व प्रकारच्या गुलामीतून मुक्त करण्याचे काम त्यांना साहित्याकडून अपेक्षित आहे. मार्क्सवादाबरोबरच नंतरच्या काळात डॉ. आंबेडकरांचा विचारही त्यांना समाजपरिवर्तनासाठी प्रेरक वाटला. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा विचार त्यांना महत्त्वाचा वाटतो. म्हणून मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या त्यांच्या लेखनामागील दोन मुख्य प्रेरणा आहेत.

**लेखनामागील प्रेरणा :**

प्रेरणा ही साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे नियंत्रण करीत असते. म्हणजेच अनुभवाला आकार देण्याचे काम प्रेरणा करीत असते. म्हणून लेखक कोणत्या प्रेरणेने प्रेरित होऊन लेखन करतो हे महत्त्वाचे ठरते. साधारणतः १९४० पासून अण्णा भाऊंनी लेखनाला आरंभ केला. प्रारंभी लावण्या, पोवाडे, लिहिता-लिहिता अण्णा भाऊ कथा, कादंबरीकडे वळले. त्यांच्या या लेखनामागच्या प्रेरणा शोधत असताना 'मार्क्सवाद' आणि 'आंबेडकरवाद' या दोन विचारधारा महत्त्वाच्या ठरतात. साम्यवाद आणि आंबेडकरवाद या त्यांच्या लेखनामागील मुख्य दोन प्रेरणा आहेत. या बरोबरच 'माणूस' आणि त्याचे 'जीवन' यावर असलेले अण्णा भाऊंचे प्रेमही त्यांना लेखनासाठी प्रेरित करते.

अर्थातच, मार्क्सवादाबरोबर 'आंबेडकरवाद' ही सुद्धा त्यांच्या लेखनामागील एक महत्त्वाची प्रेरणा आहे. आधुनिक भारतातील प्रबोधन युगाला खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांच्यापासून सुरुवात झाली. सामाजिक विषमता, धार्मिक शोषण हे भारतीयांच्या मागासलेपणाचे मुख्य कारण आहे, हे फुल्यांच्या

* अ. बा * सरस्वती महाविद्यालय



अभ्यासातून, लेखनातून आणि प्रत्यक्ष शोषण मुक्तीसाठी उभारलेल्या आंदोलनातून सिद्ध झाले. या सामाजिक विषमतेची आणि शोषणाची मुळं वैदिकांच्या धर्मग्रंथांमध्ये आहेत म्हणून फुल्यांनी या वैदिक धर्मग्रंथातील ब्राह्मणवादावर कठोर शब्दात प्रहार केले. महात्मा फुल्यांची ही समाज प्रबोधनाची चळवळ राजर्षी शाहू महाराजांनंतर पुढे नेण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकरांनी या देशातील सामाजिक विषमतेच्या विरोधात बंड पुकारले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी कृतीशील लढा दिला. त्यांच्या या लढ्यातून आंबेडकरवादाचा उदय झाला. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर आधारलेला विचार म्हणजे आंबेडकरवाद होय. सामाजिक समता प्रस्थापित करून समाजातील प्रत्येक घटकाला 'माणूस' म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करून देणे, हे आंबेडकरवादाचे ध्येय आहे. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याने अण्णा भाऊ प्रभावित झाले. त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या लढ्याबद्दल अण्णा भाऊंच्या मनात नितांत आदर होता. त्यामुळेच त्यांनी आपली 'फकिरा' ही कादंबरी डॉ. आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. यावरून अण्णा भाऊ साठे यांनी आंबेडकरवाद प्रेरक मानला, हे लक्षात येते.

**जग बदल घालुनी घाव ! :**

अण्णाभाऊंच्या बंडखोर, विद्रोही प्रतिभेचा सर्वोच्च काव्यात्म आविष्कार या गीतात झाला आहे. विद्रोही जाणिवा व्यक्त करणारी अण्णाभाऊंची ही एक महत्त्वाची रचना आहे. आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक क्रांतिकारी महापुरुष म्हणून ओळखले जातात. या गीताच्या पहिल्याच ओळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करून अण्णा भाऊ आपल्या विचाराचा वसा आणि वारसा स्पष्ट केला आहे. अत्यंत उत्कट आणि नेमक्या भाषेत त्यांनी आपल्या मनातील विद्रोही आशय शब्दबद्ध केला आहे. त्यामुळेच ही रचना रसिकाच्या हृदयाला चटकन भिडते. त्याला विषमतेने, शोषणाने पीडित असलेले जग बदलण्याची प्रेरणा देते.

भारतीय समाजात हजारो वर्षांपासून सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. वैदिक धर्मव्यवस्थेमुळे सुरुवातीला समाजात चार वर्ण अस्तित्वात आले. पुष्यमित्र शुंगाच्या काळात मनुस्मृतीच्या रचनेनंतर समाजात जातीयता आणि अस्पृश्यता निर्माण झाली. वर्णाच्या आणि जातीच्या आधारे माणसाची गुणवत्ता ठरवली जाऊ लागली. परिणामी भारतीय समाजात सामाजिक विषमता निर्माण झाली. या सामाजिक विषमतेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंड पुकारले. तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांना गुरू, प्रेरणास्थान मानून त्यांनी वैदिक धर्मव्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोह पुकारला. हे डॉ. आंबेडकरांचे विद्रोही कार्य अण्णा भाऊ साठे यांना प्रेरक वाटते. म्हणून ते प्रारंभीच ही प्रेरणा व्यक्त करतात.

"जग बदल घालुनी घाव | सांगून गेले मला भीमराव |
गुलामगिरीच्या या चिखलात | रुतून बसला का ऐरावत |
अंग झाडुनी निघ बाहेरी | घे बिनीवरती धाव ||"०१

वैदिक धर्मव्यवस्थेमध्ये शूद्रातिशूद्र आणि महिला यांना त्यांच्या न्याय हक्क-अधिकारापासून हजारो वर्ष वंचित ठेवण्यात आले. अस्पृश्य, हीन, कलंकित म्हणून त्यांचा छळ करण्यात आला. परिणामी समाजातील बहुसंख्य वर्ग प्रगतीपासून खूप दूर राहिला. हजारो वर्ष गुलामीत जगत आला. या गुलामगिरीच्या अंधारातून, चिखलातून बाहेर पडण्याचे आवाहन अण्णा भाऊ करतात. धनवंतांच्या आणि धर्मांधांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन विद्रोह केला पाहिजे. तरच सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकते.

भांडवलदार आणि धर्माचे ठेकेदार नेहमीच स्वतःच्या हिताची व्यवस्था बहुजनांवर लादत असतात. सर्वसामान्यांचे शोषण करून हे शोषक 'सात' बनतात. त्यांच्या दृष्टीने 'माणूस' हे पैसा कमविण्याचे यंत्र बनते. त्यामुळे समाजात आर्थिक आणि सामाजिक विषमता निर्माण होते. ही विषमता झुगारून देऊन माणूस म्हणून जगण्याचे बळ प्राप्त करा, असा आशय घेऊन येणारी अण्णाभाऊंची ही रचना अत्यंत मर्मग्राही आहे. तिच्यात समाजपरिवर्तनाची तळमळ आहे, बंडखोरीची प्रेरणा आहे, संघटित होण्याचा संदेश आहे.



193

अत्यंत कमी शब्दांमध्ये सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या विद्रोही जाणिवा या रचनेतून व्यक्त झाल्या आहेत.

प्रस्थापित शोषणव्यवस्था प्रदीर्घ काळापासून समाजात अस्तित्वात असल्यामुळे शोषित वर्गही तिचा वाहक बनलेला असतो. त्यामुळे हे व्यवस्था परिवर्तनाचे कार्य मोठे कठीण असते. सतत, निश्चयपूर्वक या विषमतावादी व्यवस्थेवर घाव घालावे लागतात. यासंदर्भात प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "मुख्य म्हणजे विद्रोही परिवर्तनाची वाट फार मोठी व किचकट आहे; व्रतस्थपणे ती चोखाळायची असते व मोठ्या सहनशीलतेने तिचा मानसिक भार पेलायचा असतो. विद्रोही मानसिकतेने व कार्यप्रवृत्तीने हे अध्यात्म यथार्थपणे जाणून घेतले पाहिजे. त्यांचे अंतःपोषण करण्याची साधने व आधार शोधले पाहिजेत. 'जग बदल घालुनी घाव' हा, अण्णा भाऊ साठ्यांनी उद्घोषित केलेला डॉ. आंबेडकरांचा आदेश कालोचित आहेच; पण प्रदीर्घ काळाने दृढ करीत आणलेली जरठ प्रस्थापित व्यवस्था इतकी घट्ट व कडक झालेली आहे, की आपण सर्वांनी तिच्यावर अनेक घाव, अनेकदा व दीर्घकाळ घालूनच ती उत्तरोत्तर बदलता येईल."०२ गेली हजारो वर्षे अशा प्रकारचे प्रयत्न परिवर्तनाच्या लढ्यात चालू आहेत. म्हणून अण्णाभाऊंनी डॉ. आंबेडकरांचा 'घाव' घालण्याचा सांगितलेला वारसा परिवर्तनाच्या चळवळीने नीट समजून घेणे आवश्यक आहे.

**कथेतील आंबेडकरवादी जाणिवा :**

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य लेखनाला शाहिरीने सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात ते लावण्या, पोवाडे, गाणी, तमाशे, लिहीत असत. या शाहिरी वाङ्मयाच्या निर्मितीनंतर ते कथालेखनाकडे वळले. गॉर्कीच्या अनुवादित कथा वाचून अण्णाभाऊंना कथालेखनाची प्रेरणा मिळाली. १९४९ मध्ये त्यांनी पहिली कथा लिहिली. आणि त्याच वर्षी ती प्रकाशित झाली. पुढे १९५७ मध्ये त्यांचा 'खुळंवाडी' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. दरम्यानच्या काळात अण्णा भाऊ कथाकार म्हणून नावारूपास आले होते. त्यांच्या अनेक कथांनी वाचकांचे, अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले.

कथाकार म्हणून अण्णा भाऊ साठे यांच्या नावावर २६ कथासंग्रह नोंदविले गेले आहेत. १९४९ ते १९५७ या काळात त्यांच्या १७ कथा प्रकाशित झाल्या होत्या. १९५७ ला 'खुळंवाडी' आणि १९६० ला 'बरबाद्या कंजारी' हा दुसरा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांनतर अनेक कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यांचे कथालेखन इतके लोकप्रिय झाले की इतर भाषिक वाचकांकडून त्यांच्या कथांना मागणी वाढू लागली. त्यामुळे त्यांच्या कथांची चौदा भारतीय भाषांमध्ये आणि अनेक परदेशी भाषांमध्ये भाषांतरे झाली.

अण्णा भाऊंच्या अनेक कथांमधून आंबेडकरवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. प्रामुख्याने 'सापळा', 'वळण', 'बुद्धाची शपथ', 'सोन्याचा मणी', 'उपकाराची फेड', 'विठ्ठू महार' या सहा कथांमधून आंबेडकरवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. 'सोन्याचा मणी' मधील बणा महारीण आपल्या मृत्यूनंतर तोंडात टाकण्यासाठी पदरात बांधून ठेवलेला सोन्याचा मणी डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर निवडणूक फंडाला देऊन आपली परिवर्तनावर असलेली निष्ठा व्यक्त करते. 'बुद्धाची शपथ' या कथेत गावातील लहान मुलं बुद्धांची शपथ घेऊन मुंबई गाठतात आणि शपथ खरी करून दाखवतात. 'विठ्ठू महार' ही मराठवाड्यातील खंडाळी गावावर आधारलेली कथा आहे. हसन पाटलाने अपमान केल्यामुळे पेटून उठलेला विठ्ठू "मी महार म्हणून जन्मलो ... परंतु गावाचा पोलिस पाटील म्हणूनच मरणार" अशी घोषणा करून पोलिस पाटील पदाचा अर्ज माघार घेण्यास नकार देतो. अशा अनेक कथांमधून अण्णा भाऊ साठे यांची आंबेडकरवादावरची निष्ठा व्यक्त होते.

'वळण' ही चिमा महारीणवर आधारलेली महत्त्वाची कथा आहे. महारवाड्यातील चिमा नावाची म्हातारी परंपरागत वळणाप्रमाणे वंडू मांगाकडून रेड्याचा मांस आणून खात असते. चिमा म्हातारी सोडली तर महारवाड्यातील इतर सर्व महार लोक डॉ. आंबेडकरांच्या शोषणमुक्तीच्या आंदोलनामुळे जागृत झालेली असतात. त्यामुळे मेलेल्या जनावरांचे मांस खायचे नाही असे ते ठरवतात. बळी महार हा रेड्याचा मांस खाणाऱ्या महारांना वाळीत टाकत असतो. चिमा महारीणची सवय मात्र काही केल्या मोडत नाही. मांस खाताना जो सापडेल त्याने दंड भरायचा असा नियम असतो. चिमा महारीण अनेकवेळा दंड भरते.

तिन्ही वाळीत टाकले जाते. या कारणामुळे महार-मांगांची भांडणं होतात. मास्तर आणि पाटलांच्या मध्यस्थीने वाद तात्पुरता मिटतो. शेवटी निमा म्हातारीला सत्तर वर्षांपासून असलेले वळण बदलता न आल्याने वाईट वाटते. आपले काही बरे वाईट झाले तर भावकी सहकार्य करणार नाही म्हणून एक हजार रुपयाला शेत विकून पाचशे मास्तरकडे ठेवून मरण पावते.

अस्पृश्य जातीत जन्माला आल्यानंतर सामाजिक, धार्मिक शोषणामुळे शोषितांच्या जीवनात कशाप्रकारचे प्रश्न निर्माण होतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वळण' ही कथा होय. परंपरागत जात मानसिकतेच्या बाहेर पडण्यासाठी, आपले हिनत्व कायमचे घालविण्यासाठी मेलेल्या जनावरांचे मांस खायचे नाही हा जागृत महारांचा निर्णय म्हणजे विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधातले बंड म्हणायला हवे. निमा महारीणला मात्र हे बंड पचत नाही त्यामुळे तिची शोकांतिका होते. थोडक्यात, 'वळण' ही आंबेडकरवादी विचाराची प्रेरणा घेऊन येणारी महत्त्वाची विद्रोही कथा आहे.

'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहातील 'सापळा' ही कथा गावकुसाबाहेरच्या अस्पृश्य जातींचे प्रश्न मांडणारी आहे. दादा देशमुख, दत्ता पाटील, गुणपाल शेट्ये, गुंडा चाळका ही गावातील माणसं 'कुत्रं मांजरं जनावरं नव्हं, नि मांगं म्हारं माणूस नव्हं' या परंपरागत म्हणीवर विश्वास ठेवून गावातील अस्पृश्य वर्गाचे शोषण करतात. गावातील दादा देशमुखाच्या वाड्यात एक बैल मरून दावणीत पडलेला असतो. दोन दिवस झाले तरीही गावातील महार जातीतील माणसं बैल ओढून गावाबाहेर नेऊन टाकायला तयार नसतात. याचा राग मनात धरून दादा देशमुख आणि त्याचे सहकारी महारांचा वचपा काढायचा, त्यांना वठणीवर आणायचा बेत आखतात. महार नमले नाहीत तर स्वतःलाच आपापली ढोरं ओढावी लागतील असे या पाटील-देशमुखांना वाटते. इकडे काहीही झाले तरी बैल ओढायचे नाही असे ठरवून हरीबा महाराच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महारवाडा एक होतो. त्यामुळे संघर्ष अधिकच पेटतो. गावकरी महारांच्या विरोधात सापळा रचतात. त्यांची गुरं ढोरं गावाच्या हद्दीत शिरली की कोंडवाड्यात डांबली जातात. यामुळे गावकरी आणि महारवाडा यांच्यात संघर्ष निर्माण होतो. हरीबा महार हुशार असतो. तो पारगावचा पळसाचा माळ लिलावात विकत घेऊन आपल्या लोकांना गुरांसाठी भरपूर जागा आणि चारा मिळवून देतो. या हरीबाच्या युक्तीमुळे गावकरी अडचणीत येतात. गावातली गुरं ढोरं पळसाच्या माळाला गेली की ती कोंडवाड्यात जाऊ लागतात. पाटलाची बारा ढोरं अशीच कोंडवाड्यात जातात. यामुळे पाटील आणि गावकरी हतबल होतात. शेवटी पाटील महारांसाठी रचलेला सापळा काढून टाकतो. आणि यापुढे आपण सर्वांनी माणसासारखे वागायचे असे सांगतो. हे ऐकून हरीबालाही बरे वाटते.

गावातील सामाजिक विषमतेवर आधारलेली ही कथा विद्रोही जाणीव व्यक्त करणारी आहे. सामाजिक न्यायासाठी हरीबा आणि त्याचे सहकारी संघटित होऊन लढा देतात. हरीबा आणि गावचे मुखंड यांच्या संवादातून कथेचा विद्रोही आकृतिबंध विकसित होत जातो. गावकऱ्यांच्या विरोधात अस्पृश्य मानून हीन लेखल्या गेलेल्या महार जातीने पुकारलेला हा विद्रोह सामाजिक समतेचा आणि स्वातंत्र्याचा आग्रह धरणारा आहे. अण्णा भाऊंच्या या कथेतील विद्रोह आंबेडकरवादाची प्रेरणा घेऊन अभिव्यक्त होताना दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या सामाजिक न्यायाच्या आंदोलनामुळे स्वाभिमान जागा झालेली हरीबासारखी माणसं कशी बंडखोरी करतात हे या कथेतून लक्षात येते.

'उपकाराची फेड' ही अण्णा भाऊ साठे यांची कथा भारतीय समाजव्यवस्थेतील एक भयाण वास्तव अधोरेखित करणारी आहे. धार्मिक, सामाजिक शोषणामुळे अस्पृश्य जातींचा एक वर्ग या देशामध्ये अस्तित्वात आला. ज्या वर्गाला वैदिक धर्माच्या परिभाषेत अतिशूद्र म्हटले जाते. या अतिशूद्र समजल्या गेलेल्या अस्पृश्य जातींमधील अस्पृश्यता 'उपकाराची फेड' या कथेतून लेखकाने चित्रित केली आहे. मलू महार, लखू मांग, शंकर चांभार आणि मन्या परीट ही चारही अस्पृश्य जातीतली माणसं. ज्यांच्यावर धर्माच्या नावाखाली अनेक पिढ्यांपासून अन्याय-अत्याचार होत आलेला आहे.



195

१९४२ पासून मन्या परीट स्वतःला पुढारी समजत असतो. मुंबईमध्ये राहिल्यामुळे स्वतःला शहाणा समजणारा शंकऱ्या चांभार इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतो. त्याच्याकडे चप्पल दुरुस्तीला गेलेल्या मलू महाराला तो आपल्यापेक्षा हीन समजतो. 'मांगा महाराच्या खेटरांना हात लावू नये' हा सामाजिक रिवाज तो अत्यंत काटेकोरपणे पाळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनामुळे जागृत झालेल्या मलू महाराला मात्र ही शंकऱ्या चांभाराची वागणूक अपमानास्पद वाटते. त्यामुळे तो त्याचा चहासुद्धा पीत नाही. 'माणसानं मानानं पान खावं पण शेरडावानी पाला खाऊ नये' असे त्याचे मत असते. परंतु याचे शंकऱ्याला काहीच वाटत नाही. उलट मलूला आपण सळ, आरी देतो म्हणजे मोठे उपकार करतो असे वाटते. तुझ्या उपकाराची कधीतरी फेड करेन असे सांगून मलू निघून जातो. अशातच शंकऱ्या चांभाराची म्हैस मरते. ही मेलेली म्हैस गावाबाहेर न्यायला मलू नकार देतो. सगळा गाव एक होऊन मलूला धमकी देतो. जिवंत राहायचे असेल तर म्हैस गावाबाहेर ने, असे गावातील लोक मलूला धमकावतात. परंतु मलू या धमकीला न घाबरता, जीव गेला तरी हरकत नाही पण म्हैस ओढायची नाही, असे ठरवतो. अडचणीत आलेला शंकऱ्या गावच्या पाटलाला आपण मलूला पूर्वी सळ आणि आरी देऊन कशी मदत केलेली आहे हे सांगतो. हे ऐकून मलू शंकऱ्याला म्हणतो, "एकदा सळ आणि आरी देऊन त्वा माझ्यावर उपकार केलास, आता ह्ये आरूसं नि कावडणी देऊन मी त्या उपकाराची फेड करतो. ह्ये घेऊन जा नि वढ आपली म्हस."[०३] हे ऐकून गावकरी चकित होतात.

'थड्यातील हाडं' ही कथा खेड्यातील अस्पृश्य जातींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडणारी आहे. तारगावच्या रक्षणासाठी मांग-महार आणि रामोशी मोठा त्याग करतात. या त्यागाचे प्रतीक म्हणजे रायनाक महार. या रायनाक महाराच्या स्मरणार्थ तारगावात दरवर्षी भंडारा केला जातो. या भंडाऱ्यात रायनाक महाराच्या वारसदारांना मात्र सन्मान दिला जात नाही. त्यामुळे गावचा पाटील आणि मांग, महार, रामोशी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. कथेचा प्रारंभच भंडाऱ्याच्या वर्णनातून होतो. भंडाऱ्यात पंगतीची वाट पाहात उपाशीपोटी जांभया देत महार-मांग बसलेले असतात. पुढे राणोजी नावाचा रामोशी थड्यातल्या हाडांची कुळकथा सांगतो. मांग, महार आणि रामोशी जातीतल्या अनेक शूरवीरांनी तारगावच्या रक्षणासाठी प्राण दिलेला असतो. असे असूनही या शूरवीरांच्या वारसदारांना गाव भंडाऱ्यात सन्मानाने जेवायला दिले जात नाही. "खीर संपली म्हणून कसा बसा प्रसाद घेऊन जावा" असे गावचा पाटील म्हणतो. पाटलाची ही विनंती धुडकावून लावत राणोजी आणि त्याचे सहकारी भंडाऱ्याकडे पाठ फिरवून निघून जातात. गावगाड्यातील हा भेदभाव लेखकाने मार्मिक भाषेत चित्रित केला आहे. गावातील जातवास्तव माणसाला कसे अपमानित करते याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'थड्यातील हाडं' ही कथा होय. कथेच्या शेवटी प्रसाद न घेताच उठून जाणारे महार, मांग, रामोशी बंडखोर वाटतात. त्यांचा स्वाभिमान दुखावल्यामुळे ते असे करतात. राणोजीच्या बोलण्यातून तर हा स्वाभिमान प्रखरतेने जाणवतो. तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणतो, "जावा घरला नि दुसरा भंडारा घाला. पर ह्यो मेल्याचं अन्न खाऊ नका... नगं आमास्नी तुमचा परसाद!"[०४] यातून मांग, महार, रामोशी जातीच्या मनात असलेली विद्रोहाची भावनाच व्यक्त होते.

**संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जात वास्तव :**

अण्णा भाऊ साठे यांनी १९५१ ते १९६१ या काळात 'युगांतर' या साम्यवादी पक्षाच्या मुखपत्रातून लेखन केले आहे. 'युगांतर' मधून प्रसिद्ध झालेला 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव' हा लेख अण्णा भाऊंच्या बंडखोर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. ही चळवळ सुरू होण्यापूर्वी म्हणजेच १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या असंख्य अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता.

त्यामुळे ग्रामीण भागात दलितांना छळले जाऊ लागले. बौद्ध धर्माच्या स्वीकारामुळे दलितांच्या जीवनात होऊ घातलेले परिवर्तन काँग्रेसवाल्यांना आणि गावातील प्रस्थापितांना खटकू लागले. हेच बौद्ध धर्माचा स्वीकार केलेले दलित या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अग्रेसर होते. अशा दलितांना गावातील धर्मांध जातांध लोक त्रास देऊ लागले. याचे वर्णन करताना अण्णा भाऊ लिहितात, "काही ठिकाणी महारांच्या घरावर हल्ले चढवण्यात आले आहेत. काही ठिकाणी महारांना हाताशी धरून इतरावर हात टाकण्यात आला आहे. बायका पोरांना धमक्या देणं, त्यांना शेतात येण्याची बंदी करणं, आपल्या शेतीतून जाणाऱ्या महाराच्या पाणवठ्याच्या वाटा तुडणं, आडवणं हे प्रकार पुष्कळ ठिकाणी घडत आहेत. परंतु तरीही हा नवबुद्ध यत्किंचित मागं सरलेला नाही; त्यानं आपली जागा सोडलेली नाही... डॉ. बाबासाहेबांच्या आज्ञेचं तो प्राणपणानं पालन करीत आहे."[०५] अशा छळामुळे नवबौद्ध डगमगणार नाहीत, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एकात्मता भंगणार नाही असे अण्णा भाऊंना वाटते.

**दलित साहित्य संमेलनातील भाषण :**

०२ मार्च १९५८ रोजी महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या वतीने पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून अण्णा भाऊंनी कलेले भाषण अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे. या साहित्य संमेलनासाठी नियोजित उद्घाटक आचार्य अत्रे काही कारणाने येऊ न शकल्याने अण्णा भाऊंना उद्घाटक म्हणून निमंत्रित करण्यात आले. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये दलित साहित्याला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देण्यात अण्णा भाऊंच्या लेखणीचे मोलाचे योगदान आहे. शोषित माणसाबद्दल अण्णाभाऊंच्या मनात सहानुभूती असल्यामुळे दलित साहित्य हा त्यांच्या आस्थेचा विषय आहे. त्या काळामध्ये प्रस्थापित पांढरपेशा वर्गाचे साहित्य शोषितांच्या साहित्याची, प्रश्नांची उपेक्षा करीत होते. हे पांढरपेशे समीक्षक एवढ्यावरच न थांबता वेगळ्या अशा दलित साहित्य संमेलनाची आवश्यकताच काय? असा प्रश्न उपस्थित करीत होते. त्यांच्या या प्रश्नाला अण्णा भाऊंनी प्रस्तुत भाषणातून अत्यंत समर्पक उत्तर दिले आहे.

दलितांच्या संघर्षावर समाजाचा हा डोलारा उभा आहे असे लेखकाला वाटते. अशा दलितांबद्दल लिहिताना काळजीपूर्वक लिहावे असा सल्लाही या भाषणातून ते लेखकांना देतात. ते लिहितात, "जपून लिहावे; कारण या समाजाची घडीन् घडी त्या दलिताने व्यापवली आहे. अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलिताच्या तळहातावर तरलेली आहे." अशा या दलिताचे जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझराप्रमाणे असते. ते जवळ जाऊन पाहा. मग लिहा. कारण 'जावे ज्याच्या वंशा तेव्हा कळे' हे तुकारामाचे म्हणणे खोटे नाही."[०६] यावरून अण्णा भाऊ दलितांच्या जगण्याकडे किती वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहतात हे लक्षात येते. त्याचबरोबर लेखकाची जबाबदारीही समजते. या त्यांच्या विवेचनातील "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे" हे वाक्य तर प्रस्थापितांच्या मिथकाला जबरदस्त धक्का देणारे आहे. वैदिक धर्मव्यवस्थेने अनेक पुराणकथा रचून बहुजनांचे शोषण केले आहे. शेषाच्या मस्तकावर पृथ्वीचा भार असल्याचे सांगून याच व्यवस्थेने दलितांचे मोठे शोषण केले. त्यामुळे अण्णा भाऊ आपल्या या विधानातून एक सामाजिक वास्तव मांडतात. अर्थातच, त्यांच्या या विधानातून विद्रोही, पुरोगामी, परिवर्तनवादी, वैचारिक भूमिका व्यक्त होते.

अण्णा भाऊ साहित्याचे ध्येय काय असावे हे सांगताना लिहितात, "तू गुलाम नाहीस, हे जग तुझ्या हातावर आहे, याची जाणीव करून घ्यावी. त्याचे जीवन वरच्या पातळीवर नेण्याची शिकस्त करावी आणि त्यासाठी लेखक हा सदैव आपल्या जनतेबरोबर असावा लागतो."[०७] अण्णा भाऊंचे हे विवेचन डॉ.

अ.व्या. शिक्षण संस्था



आंबेडकरांच्या "गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल" या विधानाची आठवण करून देणारे आहे. साहित्याने वाचकाच्या मनात विद्रोही जाणिवांची पेरणी करावी, त्याशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य आहे, हा अण्णा भाऊंच्या या म्हणण्याचा अन्वयार्थ होय. भाषणाच्या शेवटी तथाकथित विद्वानांचा समाचार अण्णा भाऊंनी घेतला आहे. हा समाचार घेताना ते लिहितात, "काही विद्वान म्हणतात, "अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली आहे. तेव्हा दलित हा प्राणी अस्तित्वात नाही", परंतु हा केवळ भ्रम आहे. एका गावात एका सार्वजनिक आडावर पाणी भरताना उच्चवर्णीय हिंदूंची काळजे धडधडतात. महारामांगाचा पोवरा जोपर्यंत पाण्यात आहे तोपर्यंत आपला पोवरा पाण्यात सोडत नाहीत. कित्येक हॉटेलात 'खास' कप ठेवलेले आढळतात. याचे कारण युगायुगाचे समज एका क्षणात नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्य निर्माण केले पाहिजे."०८ अशा प्रकारे अण्णाभाऊंनी सामाजिक विषमतेवर हल्ला चढवला आहे. अस्पृश्यता कायद्याने नष्ट होणार नाही तर त्यासाठी प्रबोधनाची आवश्यकता आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथा, कादंबरी, शाहिरी कविता, लोकनाट्य, नाटक आणि स्फुट लेखनातून विद्रोही जाणिवांचा उत्कट आविष्कार झाला आहे. वर्ग-जाती संघर्षाचे संमिश्र चित्रण त्यांच्या साहित्यात येते. म्हणून वर्गसमाज आणि जातिसमाज हे त्यांच्या विद्रोहाचे लक्ष्य आहे. अन्यायाविरुद्धची झुंज, संघर्ष, विद्रोह हा त्यांच्या लेखनविश्वाचा स्थायी भाव आहे. शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्ष हा त्यांच्या साहित्याचा मुख्य विषय आहे. त्यांच्या सर्व प्रकारच्या लेखनातून शोषणाचा धिक्कार, प्रतिकार आणि स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभावाचा पुरस्कार प्रत्ययास येतो. सामाजिक आणि आर्थिक विषमतेने शोषित माणसाचे 'माणूस' म्हणून असणारे अस्तित्वच नाकारले. अशा शोषितांना माणूसपण प्राप्त करून देण्यासाठीच अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य विद्रोही जीवनमूल्यांची पेरणी करते. उपेक्षित-शोषितांच्या अंतरंगातील विद्रोह आधुनिक मराठीतील ललित साहित्यात प्रथमच अण्णाभाऊंच्या साहित्यातून अनुभवाचा व्यापक पट घेऊन अभिव्यक्त झाला.

**संदर्भ सूची :**


०१. डांगळे अर्जुन व इतर (सं.) : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प. आ. १९९८, पृ. क्र. ६३.

०२. जाधव रा. ग. : निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प. आ. २००६, पृ. १५८.

०३. साठे अण्णा भाऊ : बरबाद्या कंजारी, विद्यार्थी प्रकाशन पुणे, नवीन आ. २००४. पृ. ९९.

०४. साठे अण्णा भाऊ : ठासलेल्या बंदुका, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर कोल्हापूर, चौ. आ. १९९२, पृ. २३.

०५. चौसाळकर अशोक, शिंदे रणधीर (सं.): 'युगांतर' मधील अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २०११, पृ. ४४.

०६. डांगळे अर्जुन व इतर (सं.) : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प. आ. १९९८, पृ. ११७६.

०७. तत्रैव, पृ. ११७६-११७७.

०८. तत्रैव, पृ. ११७८.


■■■



Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor

198